**MANAGEMENT COUNCIL**
**26th SEPTEMBER, 2025**

विषय क्र.४०- दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या सन 2024-25 मधील ODL व OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) च्या तयार करणेत आलेल्या वार्षिक अहवालास 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 कलम 12(7)' अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता देणेबाबत मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीसाठी.

(सोबत CIQA वार्षिक अहवालाची प्रत जोडली आहे.)

(टिपणी :विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दि. 11 जुलै 2025 रोजीच्या ई-मेलनुसार UGC DEB वेब पोर्टलवर ODL व OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) चा सन 2024-25 चा वार्षिक अहवाल सादर करण्याची तारीख दि. 31 ऑगस्ट 2025 पर्यंत असल्याचे कळविले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात या केंद्रामार्फत ODL व OL Programmes ची माहिती भरण्यात आली असून सदरचा सन 2024-25 चा तयार केलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणे आवश्यक आहे. तथापि व्यवस्थापन परिषदेची बैठक दि. 31 ऑगस्ट 2025 पूर्वी नियोजित नाही. उपरोक्त बाबी अवलोकनी घेता या केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राच्या वार्षिक अहवालास 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 कलम 12(7)' अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या सन 2024-25 मधील ODL व OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) च्या तयार करणेत आलेल्या वार्षिक अहवालास 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 कलम 12(7)' अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता देणेबाबत मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीसाठी.)

ठराव : **दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर अपलोड करावयाच्या सन 2024-25 मधील ODL व OL Programmes चा Centre for Internal Quality Assurance (CIQA) च्या तयार करणेत आलेल्या वार्षिक अहवालास 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 कलम 12(7)' अन्वये मा. कुलगुरू यांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**